उपवनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा यांचे कार्यालय
"वनभवन", दोंडाईचा रोड शहादा ४२५ ४०९.
दुरध्वनी क्रमांक :- ०२५६५ / २२३४८५, फॅक्स क्रमांक :- ०२५६५ /२२३४८५ ई-मेल:- dycf_shahada @yahoo.co.in

**पत्र**

**विषय:- वन जमीन नंदुरबार**
प्रकाश बुराई उ. सि.यो. निंभेल साठवण तलाव मौजे निंभेल ता.जि. नंदुरबार या प्रकल्पात बाधित होणाऱ्या १२.९२ हे. वनजमिन प्रस्तावबाबत

जा.क्र. ब/२०/जमिन/ २५५२ /सन २०१९-२०
शहादा. ४२५ ४०९ दिनांक. ३ /०१/२०२०

प्रति,
कार्यकारी अभियंता ,नंदुरबार
मध्यम प्रकल्प विभाग ,नंदुरबार

संदर्भ :भारत सरकार पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय केंद्रस्थ अधिकारी नागपुर यांचेकडील पत्र क्रमांक FC-II/MH-११०/२०१९-NGP/६०१० दि. १८.१२.२०१९

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये केंद्र शासनाने, प्रकाश बुराई उ. सि.यो. निंभेल साठवण तलाव मौजे निंभेल ता.जि. नंदुरबार या प्रकल्पात बाधित होणाऱ्या १२.९२ हे. वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रकाश बुराई उ. सि.यो. निंभेल साठवण तलाव मौजे निंभेल करीता वन जमीन वळ्तीकरणाच्या एकुण १२.९२ हे. क्षेत्राच्या प्रस्तावास तत्वत: तंजुरी प्रदान केलेली आहे. सदर प्रस्तावासाठी या वनविभागातील क्षेत्र १२.९२ हे बांधित होत आहे. त्या अनुषंगाने संदर्भीय पत्रात नमुद केलेल्या अटी नुसार पुर्तता करण्यात यावी. सदर प्रल्कपात बांधित होणार वनजमीन अतीम मान्यता मिळणेसाठी खालील प्रमाणे रक्कम भरणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर | भरणाकरावयाची एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | Net Present Value नक्त वर्तमान मुल्य | ६,२६,०००X १२.९२ हे. | ८०,८७,९२०.०० |
| २ | पर्यायी वनीकरण (CA) १० वर्षाचे योजने प्रमाणे क्षेत्र १२.९२ हे. | ६,९५,२८९X १२.९२ | ८९,८३,१३४.०० |
| ३ | झाडे तोडीची खर्च ३१ ते ४५ CM मधील ९ झाडे | -- | ४३४०५.०० |
| | | भरणाकरावयाची एकुण रक्कम | १,७१,१४,४५९.०० |

(अक्षरी एक कोटी एक्कात्तर लक्ष चौदा हजार चारशे एकोनसाठ) मात्र सदर रक्कम Ad-hoc CAMPA चे खात्यामध्ये RTGS प्रणाली द्वारे भरणा करणे आवश्यक आहे. तव्दतच विषयांकित प्रकल्याचे अनुषंगाने या विभागाकडून मागणी केलेली रक्कम व आपले कार्यालयातुन भरणा केलेली

F:\Land 18614\LND LETTER.doc



Scanned by CamScanner

रक्कमेचे विवरणपत्र या कार्यालयात पाठविण्यात यावे जेणेकरुन अतिम मान्यतेचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयात सादर करता येईल .

उपवनसंरक्षक,
नंदुरबार वनविभाग,शहादा

प्रतिलीपी - म. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी - उपवनसंरक्षक जळगांव वनविभाग,जळगांव यांना सविनय सादर
२/- प्रकल्पात बांधित होणा-या १२.९२ हे. वनजमीनीस पर्यायी जमीन म्हणुन मौजे जुनवणे ता अमळनेर जि जळगांव येथील गट क्रं. ३२ मधील देण्यात आल्याने सर्व्हे, सिंमाकन ,पिलर्स उभारणे व वाहतुक खर्च इ.खर्च आपल्या विभागामार्फत प्रकल्प यंत्रणेस कळविण्यात यावा. हि. विनंती.

F:\Land 18614\LND LETTER.doc

Scanned by CamScanner

## उपवनसरक्षक,जळगांव वनविभाग यांचे कार्यालय,जळगांव

प्रशासकिय इमारत,टप्पा-3 तळमजला,आकाशवाणी केंद्राजवळ,जळगांव-425001

☎95-0257-2229840 Fax-0257- 2227661 वृक्ष : पुत्र निसर्गाचा ! सखा मानवाचा !!

विषय : प्रकाशा बुराई उ.सि.यो.निर्मल साठवण तलाव मौजे निर्मल ता.जि. नंदुरबार या प्रकल्पात 12.92 हे. वनजमिन बाधित होत आहे.

जा.क्र.ब/सर्व्हे/प्र.क्र./ 4115 /2019-20.

जळगाव 425 001 दिनांक 18/01/2020.

प्रति,

म. कार्यकारी अभियंता,

मध्यम प्रकल्प विभाग, नंदुरबार

संदर्भ - १. आपलेकडील पत्र क्र.पशा/भुंस/755 दिनांक 07/03/2018.

२. या कार्यालयाचे पत्र क्र.ब/सर्व्हे/260 दिनांक 29/05/2018.

३. उपवनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा यांचेकडील पत्र क्र.ब/२०/जमिन/2772 दिनांक 03/01/2019.

विषयांकित प्रकरणी संदर्भीत पत्रान्वये या वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील मौजे जुनोने ता. अमळनेर जि. जळगावं येथील गट क्र. 32 क्षेत्र 28.53 हे. पैकी 12.92 हे. क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावीत केलेले आहे. सदर क्षेत्राचे सर्व्हेक्षण सिमाकनासाठी लागणारा खर्च यंत्रणेस कळविण्याबाबत संदर्भीत पत्र क्र.३ अन्वये विनंती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मौजे जुनोने ता. अमळनेर जि. जळगावं येथील गट क्र. 32 क्षेत्र 28.53 हे. पैकी 12.92 हेक्टर क्षेत्राचे सर्व्हेक्षण सिमाकन करण्यासाठी नविन दगडी सिमेंट बुरुज हद्दीवर बसविण्याकरिता अंदाजे रु. 1,35,000/- खर्च लागणार आसल्याने सदर रक्कम वर्ग करण्या यावी हि विनंती.

(दि.वा.पगार)

उप वनसंरक्षक

जळगाव वनविभाग, जळगाव

प्रतिलीपी - उपवनंसरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह आग्रेषित.